**प्रेसनोट**

दि.१७/१२/२०२०

**तहसीलदारांचे कडून काम करून देण्यासाठी लाच मागणी करणाऱ्या खाजगी इसमांवर कारवाई**

---

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर, गु.र.नं. १२७४/२०२० |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७ अ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) राजेंद्र बाळासाहेब मोरे, रा. फुरसुंगी ता. हवेली जिल्हा पुणे.<br>२) गुंजाळ, पुर्ण नाव पत्ता माहिती नाही. दोघे खाजगी इसम. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ६,००,०००/- ( सहा लाख रूपये) |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी दिनांक :- दि. १७/०८/२०२०, दि. १८/०८/२०२० व दिनांक १९/०८/२०२०<br>गुन्हा दाखल :- १६/१२/२०२०<br>मौजे फुरसुंगी गावातील जमिनीतील इनामी शेरा रद्द करण्याचे प्रकरण तहसील हवेली कार्यालय, हवेली पुणे येथे प्रलंबित होते. सदरचे प्रकरणात वरील दोन्ही आरोपी इसमांनी वैयक्तिक प्रभावाचा वापर करून लोकसेवक तहसीलदार हवेली यांचेकडून काम करून देतो असे सांगून इनामी शेरा रद्द करण्यासाठीचे पत्र मिळवून देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ६,००,०००/- लाचेची मागणी करून इनामी शेरा रद्द करण्यासाठी नोद घेण्याबाबतचे पत्र मिळवून दिले म्हणून लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आरोपी क्रमांक १ यास सदर अटक करण्यात आली आहे.<br>अटक आरोपीस मा. विशेष न्यायालयात हजर केले असता गुन्हयाचे तपासकामी दिनांक १८/१२/२०२० रोजीपर्यंत पोलीस कस्टडी रिमांड देण्यात आली असून गुन्हयाचा तपास श्री. सुनिल बिले, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.पुणे युनिट हे करत आहेत. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री.सुरज गुरव, ला.प्र.वि.पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.